महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

सोमवार दि.२५ मे २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ अंक : २७७ | किंमत २ रुपये | 7499615933

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक न्यायालयाच्या कचाट्यात अडकणार?

## हरकतीवर २५ मे पर्यंत निर्णय; तोपर्यंत तालुक्यात बुलेटची बुकिंग थंड!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

सहकार क्षेत्रातील निवडणुका म्हटले की विचारधारा, विकासाने सभासदांचे प्रश्न यापेक्षा व्यवस्थापन कौशल्य जास्त महत्त्वाचे मानले जाते, अशी जनमानसात चर्चा असते. त्यात नांदेड जिल्हा बँकेच्या निवडणुकीने तर यंदा वेगळाच रंग घेतला असून, प्रारूप मतदार यादी पेक्षा बुलेट यादी ची चर्चा गावोगावी रंगू लागल्याने राजकीय वातावरण हास्याची लाट पसरली आहे. चार मे रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीवर जिल्हाभरातून तब्बल १२९ हरकती दाखल झाल्या असून, त्यात देगलूर तालुक्यातील हरकतीचाही समावेश आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर हरकती दाखल झाल्याने प्रशासनाने मतदार यादी तयार केली होती की प्रायोगिक मसुदा असा सवाल आता चहाटळ चौकात विचारला जात आहे. विभागीय सहनिबंधक हे २५ मे पर्यंत सर्व हरकतीवर निर्णय देणार असून, २९ मे रोजी अंतिम यादी मतदार प्रसिद्ध होणार आहे. मात्र अंतिम यादी पेक्षा अंतिम डिलिव्हरी कधी होणार याकडेच काहींचे लक्ष लागल्याची कुजबुज आहे. देगलूर तालुक्यात गेल्या काही दिवसापासून बुलेटची जोरदार चर्चा सुरू आहे. निवडणुकीत मतदारांना विचारांची गती मिळावी म्हणून काहीजण रॉयल पातळीवर तयारी करत असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. पण आता हरकती चौकशा आणि माध्यमांमधील बातम्या मुळे हे बुलेट सुसाट धावणार की थेट न्यायालयाच्या पार्किंग मध्ये उभे राहणार, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, एका तालुक्यात एकाच वेळी तब्बल कितीतरी बुलेट दाखल झाल्यास धुरळा उडेल आणि निवडणूक आयोगापेक्षा सोशल मीडियावरच चौकशी सुरू होईल, अशी भीती काही रणनीतीकारांना वाटू लागली आहे. त्यामुळे आता दोन चाकी ऐवजी दोन हजाराच्या चाकावर भर दिला जाऊ शकतो. अशी मिशील चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. काही संभाव्य मतदारा मतदारांनीही सावध भूमिका घेत, आधी अंतिम मतदार यादी येऊ द्या मगच गाडीची टेस्ट ड्राईव्ह घेऊ, अशी भूमिका घेतल्याचे समजते. तर काहींनी हेल्मेट मिळणार का? अशी विचारणा केल्याने वातावरण आणखी रंगतदार झाले आहे. एकूणच जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मतदारांची प्रश्न बाजूला पडले असून मतदारांची गाडी कोणत्या गेअरमध्ये जाणार? हा खरा चर्चेचा विषय ठरला आहे. आता २९ मे नंतर मतदारांची बुलेट रस्त्यावर धावती की संपूर्ण प्रकरण न्यायालयाच्या स्पीड ब्रेकर वर अडकते हे पाहणे अहो औत्सुक्याचे ठरणार आहे.



# एक्का-बादशहा जुगार अड्ड्यावर छापा,१३ आरोपीसह ६६७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हनेगाव । संतोष चिद्रावार लोणीकर**

मरखेल पोलीस स्टेशन येथे ऑपरेशन क्रॅक डाउन अंतर्गत वझर ते शिळवणी बॉडर तांडा जाणाऱ्या रस्त्यालगत जिल्हा परिषद शाळेच्या समोर चिंचाच्या झाडाखाली वझर ता. देगलूर धाडसी छापा टाकून चालणाऱ्या 'एक्का बादशहा' नावाच्या जुगार अड्डयाचा पर्दाफाश केला आहे.२४ मे रोजी दुपारी २वाजून ४० मिनिटांच्या सुमारास करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी १३ जुगाऱ्यांना रंगेहाथ अटक केली असून त्यांच्याकडून रोख रक्कम आणि एक मोटारसायकल महा २६ सी एन ६६८८ गाडीसह ६६७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



मरखेल पोलीस ठाण्याचे पथक परिसरात फिरत असताना वझर ते शिळवणी बॉडर तांडा जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या समोर चिंचाच्या झाडाखाली बसून ५२ ताश पत्यांवर पैशाची हारजीत करून 'एक्का - बादशहा ' नावाचा जुगार खेळला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस ठाण्याचे प्रमुख रवि हुंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विलास पवार, नारायण येगांले,बोदमवाड,सह इतर कर्मचारी यांच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी अजीज अहमदसाब मुल्ला वय ( २९ )वर्षे भारत राम सुकणे वय (२५ )वर्षे ज्ञानेश्वर गोविंद तलवाडे वय (२९) पळून गेलेले आरोपी गुलाब दिंगाबंर मदने,माधव धनाजी मदने, प्रशांत गोविंद देवकत्ते, सदानंद माधवराव पांढरे, गणपत पंढरी गवते,मौजम मुल्ला, मारोती ज्ञानोबा चोरमल्ले, पिंटू शिवाजी खरात, संजय गायकवाड, बालाजी डावरगावे, सर्व राहणार वझर हा पैशांचा हरजितवर एक्का बादशहा नावाचा जुगार खेळताना मिळून आले.


पोलीसांनी आरोपीची अंगझडती घेतली असता नगदी ६७०० रुपये व ६०००० एक काळया रंगाची फॅशन प्रोसह एकूण ६६७०० असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# सईद खॉन यांच्या मार्गदर्शनाखाले विकास कामाना गती;वाद नाही विकास हाच ध्यास!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी । रमेश मुलगीर**

शिवसेनेच्या नेतृत्वाखाली पाथरी शहरात विकासकामांना नवा वेग पाथरी शहरात सध्या स्वच्छता, नालेसफाई आणि विविध विकासकामांचा वेग वाढला असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. जनतेचा विश्वास जिंकायचा असेल तर मैदानात उतरून काम करावे लागते, या भूमिकेतून शहरातील विविध भागांमध्ये प्रत्यक्ष कामे सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



शिवसेना अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांच्या मार्गदर्शनाखाली पाथरी शहरात विकासकामांना गती मिळत असून नगराध्यक्ष आसेफ खान व उपनगराध्यक्ष आलोक चौधरी यांच्या नेतृत्वाखाली विविध कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. पाथरी शहरातील मोठ्या नाल्यांची साफ सफाई, रस्ते परिसरातील स्वच्छता मोहीम, नागरिकांच्या दैनंदिन समस्यांचे निराकरण तसेच विविध विकास कामांमुळे पाथरी शहराचा चेहरामोहरा बदलताना दिसत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नाले सफाई वर विशेष भर देण्यात येत असून प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा समन्वय नागरिकांसाठी दिलासादायक ठरत आहे.

या कामांमध्ये शिवसेना नगरसेवक गोविंद हरकळ, साजेद अली राज, अमोल भाले पाटील, उद्धव नाईक, अनिल ढवळे, हसीब खान, मुजीब आलम आणि खालिद बिन हवेल हे नागरिकांच्या प्रत्येक प्रश्नावर तत्परतेने लक्ष देत असल्याचे दिसून येत आहे.

तसेच नगर परिषद कॉन्ट्रॅक्टर शाहुराव गवारे, अब्दुल्ला खान आणि गोटू गिराम यांच्या देखरेखीखाली स्वच्छता आणि विकासकामे अधिक वेगाने सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.शहरातील नागरिकांनीही सुरू असलेल्या कामांचे स्वागत करत स्वच्छ पाथरी, सुंदर पाथरी या संकल्पनेला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. अनेक भागांमध्ये प्रत्यक्ष कामे सुरू झाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून फक्त बोलणारे नाही, तर कामातून इतिहास घडवणारे नेतृत्व अशी भावना व्यक्त केली जात आहे.

पाथरी शहर विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असून वाद नाही विकास हाच ध्यास! हा संदेश स्थानिक पातळी वर अधिक प्रभावीपणे उमटताना दिसत आहे.

# मलिकपुरा परिसरात सुरु असलेल्या विविध विकासकामांची बाजीराव भैय्या धर्माधिकारी व पदाधिकाऱ्यांकडून पाहणी!

## नागरिकांच्या समस्या जाणून घेत पुढील विकास आराखड्याचा घेतला आढावा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी शहरातील मलिकपुरा भागामध्ये जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत नागरी दलितेत्तर योजनेमधून करण्यात आलेल्या रस्ता व नाली बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी व न.प.पदाधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली. या विकासकामांमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून स्वच्छता, वाहतूक व्यवस्था आणि दैनंदिन जीवनमानात सुधारणा होणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

मलिकपुरा भागातील जामा मज्जीद ते अफसर शेख, निजाम शेख व मेहराज सर यांच्या घरापर्यंत सुमारे ५० लाख रुपये खर्चून नाली व रस्ता बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच हबीबपुरा मज्जीद परिसरातील रस्त्याचे कामही २६ लाख रुपये खर्चून नुकतेच पूर्ण झाले आहे. यावेळी मलिकपुरा भागातील रस्ते व नालेसफाई कामांची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधण्यात आला. नागरिकांच्या समस्या, सूचना आणि अपेक्षा जाणून घेत येणाऱ्या २०२६-२७ च्या डीपीडीसी अंतर्गत या प्रभागात आणखी विकासकामे प्रस्तावित करण्याबाबतही प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. राज्याचे माजी मंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे आणि राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी नगर परिषद शहरात सर्वांगिण, समतोल व लोकाभिमुख विकास घडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगर परिषद गटनेते वैजनाथ सोळंके, भाजप नेते निळकंठ चाटे, बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, स्वच्छता सभापती श्रीकृष्ण कराड, नगरसेवक हाजी बाबा, रमेश पवार, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी ६० टक्के डिझेल वितरित करा-आ.कोहळीकरांची जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । चंद्रकांत भोरे**

हदगाव खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना शेती अवजारांसाठी आवश्यक असणारे पेट्रोल व डिझेल सहज उपलब्ध व्हावे यासाठी हदगाव विधानसभेचे लोकप्रिय आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडून हदगाव हिमायतनगर मतदारसंघातील पेट्रोल पंपचालकांना महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. याबाबतचे अधिकृत पत्र जरी करण्यात आले आहे. सध्या जिल्ह्यात खरीप हंगामातील शेतीचे कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून पेरणीचे दिवस अत्यंत जवळ आले असून शेतकरी ट्रॅक्टर, पंप, कृषी यंत्रसामग्री ,व इतर शेती कामासाठी डिझेलवर अवलंबून आहेत, मात्र अनेक पेट्रोल पंपावर शेतकऱ्यांना वेळेवर डिझेल मिळत नसल्याच्या तक्रारीही प्राप्त झालेल्या होत्या. त्यामुळे शेतीच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होत,असून शेतकऱ्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. शेतीचे कामे खोळंबली होती. ही बाब लक्षात घेऊन आमदार कोहळीकर यांनी पत्रकाद्वारे जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपावर उपलब्ध असलेल्या एकूण पेट्रोल व डिझेल साठ्यापैकी किमान ६०% डिझेल शेतकरी व कृषी यंत्रसामग्रीसाठी राखीव ठेवण्यासाठी यावे तसेच उर्वरित ४०% इंधन इतर वाहनांसाठी सर्वसामान्य वापरासाठी वितरित करण्यात यावे. शेतकरी बांधवांना प्रधान्याने डिझेल पुरवठा होत आहे की नाही.



याची तपासणी करण्यासाठी विशेष भरारी पथके नियुक्त करण्याचे आदेश देण्यात आले त्यासोबतही पेट्रोल पंप चालकांनी शेतीसाठी आलेल्या ट्रॅक्टर व कृषी वाहनांना प्रधान्याने इंधन देण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात याव्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पेट्रोल पंपावर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, या आदेशामुळे हदगाव हिमायतनगर मतदारसंघातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. खरीप हंगामातील शेतीकामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या निर्णयाचे शेतकरी वर्गातून स्वागत करण्यात येत आहे,

## आगरी समाजाच्या विकासाला माझे सर्वप्रथम प्राधान्य–महेंद्रशेठ घरत

# कर्जतच्या आगरी समाज सभागृहाचे महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते शानदार उदघाटन!

लोकनेता न्यूज नेटवर्क
**उरण । विठ्ठल ममताबादे**

कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या वातानुकूलित भव्य अशा सभागृहाचे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते शनिवारी (ता. २३) मोठया उत्साहात उदघाटन करण्यात आले. या समारंभाला बदलापूरच्या नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, जिल्हा परिषद सदस्य बाबूशेठ घारे, उद्योजक मयूर पिसे आदी मान्यवर उपस्थित होते.





कर्जतच्या आगरी समाज सभागृहाचे संपूर्ण अत्याधुनिक नूतनीकरण यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे संस्थापक–अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी १२ लाख ५० हजार रुपये सढळ हस्ते केलेल्या देणगीतून करण्यात आले आहे. त्यामुळे कर्जत तालुका आगरी समाज संघटनेतर्फे महेंद्रशेठ घरत यांचा यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला. महेंद्रशेठ घरत हे आगरी समाजातील आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे नेतृत्व करणारे अवलिया आणि दानशूर व्यक्तिमत्त्व आहेत, याचा कर्जतच्या आगरी समाजाला अभिमान आहे, असे कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, मला आगरी असल्याचा सार्थ अभिमान आहे. आपला समाज मेहनतीने आणि सन्मानाने जगण्याला अधिक प्राधान्य देतो. कुणापुढे कारण नसताना झुकत नाही. ताठ कण्याचा आपला समाज मला प्रिय आहे. त्यामुळे आगरी समाजाच्या उत्कर्षासाठी मी सर्व प्रकारचे सहकार्य करतो. समाजाच्या मागे मी कायमच खंबीरपणे उभा आहे आणि राहीन. कर्जतचा आगरी समाज संघटित होऊन समाजाच्या भल्यासाठी प्रयत्न करतोय. त्यामुळे कर्जतच्या आगरी समाजावर माझे विशेष प्रेम आहे. त्यांच्यासाठी माझा मदतीचा हात कायमच राहील. मी जागतिक पातळीवर कामगारांचे नेतृत्व करीत आहे. त्यामुळे जगभर फिरतो; परंतु मी माझ्या गावाच्या विकासाबाबत संवेदनशील आहे. आज राज्यात रोल मॉडेल ठरेल, असा माझ्या शेलघर गावाचा सुनियोजित विकास मी करून घेतला आहे. आज तिथे ग्रामस्थांना बोट ठेवायला जागा नाही. मी जिल्हा परिषद सदस्य असताना गावोगावी जलकुंभ बांधून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतविला. लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्यावर अभ्यास करून अधिकाऱ्यांवर वचक ठेवला आणि विकासात्मक कामे करून घेतली. रायगडमध्ये सी. डी. देशमुख यांच्यानंतर मी जगाच्या व्यासपीठावर नावलौकिक मिळवतोय. तिथेही मी त्या त्या देशांच्या कामगार नेत्यांवर वचक ठेवून आहे.

या समारंभाला बदलापूरच्या नगराध्यक्षा रुचिता घोरपडे, जिल्हा परिषद सदस्य बाबूशेठ घारे, उद्योजक मयूर पिसे, कर्जत पंचायत समिती सदस्य भगवान चंचे, नितीन धुळे, रेश्माताई जोशी, मंगेश म्हसकर, विपूल पाटील, तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. हा समारंभ हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील सामाजिक सभागृह नेरळ–बोपेले येथे पार पडला. यावेळी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, माजी अध्यक्ष नागो गवळी, एकनाथ धुळे, सावळाराम जाधव, कर्जत तालुका काँग्रेस अध्यक्ष संजय गवळी, उरण तालुका प्रमुख विनोद म्हात्रे, किरीट पाटील, वैभव पाटील, निखिल ढवळे आणि एम. जी. ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. यावेळी जितेंद्र गवळी यांनी सूत्रसंचालन केले, तर भरत भगत यांनी प्रास्ताविक केले.

## जनतेच्या समस्या थेट पालकमंत्र्यांच्या लॅपटॉपवर दिग्रस मतदारसंघाचा 'डिजिटल' कारभार!

लोकनेता न्यूज नेटवर्क
**कीशोर की. कांबळे । दिग्रस**

आपल्या मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या, तक्रारी आणि मागण्या सुटसुटीतपणे व वेळेत मार्गी लागाव्या यासाठी यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सुरू केलेली 'डिजिटल दिग्रस' ही ऑनलाईन व्यवस्था नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. दिग्रस येथील जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सुरू असलेल्या या ऑनलाईन नोंदणी पद्धतीमुळे कामात कमालीची पारदर्शकता आली असून, नागरिकांना थेट पालकमंत्र्यांपर्यंत आपली गाऱ्हाणी पोहोचवणे सोपे झाले आहे. मतदारसंघातील जनतेशी थेट नाळ जोडून ठेवणाऱ्या या आधुनिक कार्यपद्धतीची माहिती नागरिकांपर्यंत सतत पोहोचणे गरजेचे आहे, जेणेकरून जास्तीत जास्त लोकांना आपल्या प्रलंबित कामांसाठी याचा वापर करता येईल.दिग्रस कार्यालयात येणाऱ्या नागरिकांचे निवेदन आणि माहिती तिथले प्रतिनिधी एका विशेष 'प'मध्ये अपलोड करतात. यामध्ये तक्रारदाराचा फोटो आणि निवेदनाची प्रत डिजिटल प्रणालीत नोंदवली जाते.निवेदन नोंदवल्यानंतर नागरिकांना एक अधिकृत तक्रार क्रमांक दिला जातो. या क्रमांकाच्या आधारे नागरिकांना आपल्या अर्जाचा पुढील पाठपुरावा घरबसल्या ट्रॅक करता येतो.



या तंत्रज्ञानामुळे पालकमंत्री संजय राठोड हे दौऱ्यावर किंवा मंत्रालयात कुठेही असले, तरी त्यांना दिग्रस कार्यालयात आलेल्या तक्रारी आणि निवेदने थेट आपल्या लॅपटॉपवर पाहता येतात व त्यावर ते तात्काळ आवश्यक निर्णय घेऊ शकतात.सुरुवातीला तालुकास्तरीय प्रतिनिधींमार्फत स्थानिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. गरज पडल्यास जिल्हा कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी व स्वीय सहाय्यक यामध्ये मदत करतात. मात्र, तालुका किंवा जिल्हा पातळीवर न सुटणाऱ्या क्लिष्ट किंवा गंभीर प्रकरणांमध्ये स्वतः पालकमंत्री संजय राठोड, संबंधित शासकीय अधिकारी आणि तक्रारदार यांची संयुक्त बैठक घेऊन प्रश्न तातडीने निकाली काढला जातो.या प्रणालीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, तक्रारीचे निवारण झाल्यानंतर नागरिक समाधानी आहेत की नाही याची खात्री करण्यासाठी मुंबई कार्यालयातील प्रतिनिधी थेट दूरध्वनीद्वारे (फोन करून) संपर्क साधतात. नागरिकांचे संपूर्ण समाधान झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच ती तक्रार प्रणालीमध्ये 'बंद' केली जाते.

> **मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाला वैयक्तिकरीत्या रोज भेटणे वेळेअभावी नेहमीच शक्य होत नाही. म्हणूनच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही हक्काची डिजिटल व्यवस्था निर्माण केली आहे. नागरिकांनी आपल्या वैयक्तिक किंवा सामाजिक समस्यांसाठी, तसेच शासकीय योजनांच्या अडचणींसाठी दिग्रस कार्यालयाशी हक्काने संपर्क साधावा.**
> **– संजयभाऊ राठोड (मंत्री, मृद व जलसंधारण तथा पालकमंत्री, यवतमाळ)**

## सोना गार्डन सारखणी येथे नायक कारभारी पुजारी परिषद

लोकनेता न्यूज नेटवर्क
**सारखानी । डॉ.भारत उद्धव राठोड**

किनवट जिल्हा हिंदू गोर बंजारा लबाडी धाडी लमान समाजबांधव यांच्या वतीने सारखनी येथील सोना गार्डन येथे नायक, कारभारी, पुजारी परिषद मंगळवार दि १९ मे रोजी संपन्न झाली. या परिषदेत हिंदू गोरबंजारा, लमान समाजातील नायक, कारभारीची उज्वल परंपरा व समाजातील समृद्ध रूढी परंपरा यावर विचारमंथन करण्यासाठी नायक, कारभारी, डावसाने, हसाबी, नसाबी यांचे एकत्रिकरण करून संस्कृतीचा समृद्ध ठेवा जतन करण्याचा उद्देश या परिषदेत व्यक्त करण्यात आला.

परिषदेला प्रमुख
मार्गदर्शक म्हणून विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय मंत्री माननीय गोपालजी, माननीय रामेश्वरजी नाईक कक्ष प्रमुख मुख्यमंत्री सहाय्यता निधी महाराष्ट्र राज्य तसेच विश्व हिंदू परिषदेचे देवगिरी प्रांतमंत्री माननीय श्री योगेश्वर गर्गे, देवगिरी प्रांताचे धर्मजागरण प्रमुख माननीय सिद्धेश्वर बिराजदार लाभले होते. आपल्या प्रमुख मार्गदर्शनात मान्यवरांनी आपल्या समाजातील उज्वल परंपरा, समृद्ध रूढींचा ठेवा जतन करून आपली संस्कृती अबाधित राहील यासाठी सदैव प्रयत्नरत राहण्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संयोजकश्री. मा. प्रशांतभाऊ पुरसिंग राठोड, तर सहसंयोजक उल्हास थाऊ जाधव यांच्या सर्व सहकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.



## मुख्याधिकारी विठ्ठल केदारे यांच्या बदलीच्या चर्चेला उधाण

लोकनेता न्यूज नेटवर्क
**कीशोर की. कांबळे । दारव्हा**

दारव्हा : दारव्हा नगर परिषद येथील मुख्याधिकारी श्री. विठ्ठल केदारे यांच्या बदलीबाबत शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. श्री. केदारे हे दिनांक ३१ मे २०२३ पासून दारव्हा नगर परिषद येथे कार्यरत असून सध्या त्यांच्याकडे दिग्रस नगर परिषद चा अतिरिक्त पदभार देखील असल्याची माहिती आहे.



शहरात सुरू असलेल्या चर्चेनुसार, मुख्याधिकारी यांच्या कार्यपद्धतीबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अनेक तक्रारी दाखल झाल्याचे बोलले जात आहे. तसेच यापूर्वी त्यांच्याकडे नेर नगर परिषद चा अतिरिक्त पदभार देण्यात आला होता. मात्र संबंधित तक्रारींची दखल घेत वरिष्ठ स्तरावरून तो पदभार काढण्यात आल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.दरम्यान, दारव्हा येथे जवळपास तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होत आल्याने बदली अधिनियमाअंतर्गत त्यांच्या बदलीची मागणी जोर धरत असल्याचे सांगितले जात आहे. काही तक्रारकर्त्यांनी त्यांची जिल्ह्याबाहेर बदली करण्यात यावी अशी मागणी वरिष्ठ प्रशासनाकडे केल्याची चर्चा आहे.

तर दुसरीकडे, सध्या दिग्रस नगर परिषदचा अतिरिक्त पदभार त्यांच्या कडे असल्याने आगामी काळात त्यांची बदली थेट दिग्रस येथे होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, याबाबत राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चांना वेग आला आहे. प्रशासन यासंदर्भात कोणता निर्णय घेणार याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## लोकशाही पत्रकार संघाच्या पैठण तालुका उपाध्यक्षपदी सुरेश ताठे यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क
**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या पैठण तालुका उपाध्यक्षपदी सुरेश ताठे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड
लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय अध्यक्ष भागवत वैद्य यांनी जाहीर केली. या निवडीमुळे पैठण तालुक्यातील पत्रकार व सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.सुरेश ताठे हे पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात अनेक वर्षांपासून सक्रिय असून ग्रामीण भागातील विविध समस्या, नागरिकांचे प्रश्न तसेच सामाजिक विषयांवर त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत लोकशाही पत्रकार संघाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.



निवडीची घोषणा होताच पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार तसेच विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न सोडविणे, ग्रामीण पत्रकारांना न्याय मिळवून देणे तसेच संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची भावना सुरेश ताठे यांनी व्यक्त केली.

यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, सुरेश ताठे यांच्या अनुभवाचा व कार्यक्षमतेचा संघटनेला निश्चितच फायदा होणार असून पैठण तालुक्यात संघटना अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# आजच्या तरुणाची कुठे गेली संवेदनशीलता,देविदास फुलारी

## 'माझ्या वाटेवरती' चारोळी संग्रहाचे नायगाव येथे प्रकाशन

लोकनेता न्यूज नेटवर्क
**नायगाव । प्रतिनिधी**

भारत देशापेक्षाही चीन देशात जास्तीची लोकसंख्या असली तरी तेथील सुशिक्षित बेरोजगारांना अनेक उद्योग शासनाने लावून दिले परंतु भारताने असे पाऊल तरुणांच्या बाबतीमध्ये आजवर तरी उचलले नाही म्हणून आजच्या तरुणाची कुठे चाललेली आहे संवेदनशीलता असे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी यांनी काढले.

नायगाव येथील अंबिका गार्डन मध्ये 'माझ्या वाटेवरती' या चारोळी संग्रहाचे प्रकाशन साहित्यिक देविदास फुलारी यांच्या हस्ते झाले याप्रसंगी ते बोलत होते.



व्यासपीठावर आर्य–वैश्य संघटनेचे नायगाव तालुका अध्यक्ष सतीश मेडेवार, साहित्यिक वीरभद्र मिरेवाड,माजी नगराध्यक्षा सौ.मिनाताई कल्याण, बाळासाहेब पांडे, कवी पंडित पाटील यांची उपस्थिती होती.

सारासार विचार बाजूला सारून धावाधाव करणारी ,अशांततेने जळणारी ,अनितेचे व्यवहार करणारी, खोटं–नाट बोलणारी आणि मन शांत करण्यासाठी झोपेच्या गोळ्या घेणारी माणसं आजूबाजूला पाहून गादेवार अस्वस्थ होतात त्याचे प्रतिबिंब चारोळी संग्रहात उमटलेले आहे असे मत साहित्यिक वीरभद्र मिरेवाड यांनी व्यक्त केले.

तर बाळासाहेब पांडे यांनी बजरंग गादेवारांनी व्यवसाय आणि अभिरुची दोन्ही जपत मराठी साहित्य विश्वात चारोळी लिहून पदार्पण केल्याबद्दल त्यांच्या लेखनास शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक सौ.शोभा गादेवार यांनी केले तर चारोळी संग्रहाच्या निर्मितीबद्दल कवी बजरंग गादेवार यांनी आपल्या आठवणी जागवल्या.

प्रारंभी वृक्षपूजा करून मान्यवरांनी माल्यार्पण केले. कवी व्यंकट आनेराये यांनी बहारदार सूत्रसंचालन तर पवन गादेवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी शाहीर दिगू तुमवाड , पत्रकार माधव बैलकवाड, पल्लवी वडजे,ज्ञानेश्वर शिंदे , बालाजी पेटेकर,जयंत पवळे ,जीवन मांजरमकर, मन्मथ पाटील ,सौ.शोभा गादेवार, मनोहर गादेवार, जी .एच. शिंदे, चंद्रकांत गायकवाड यासह गादेवार यांचे नातेवाईक व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासकीय पेन्शन योजनेतील जाचक अटी रद्द होणार;मंत्र्यांकडून अविनाश पाटील हरडफकर यांना सकारात्मक आश्वासन!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना आणि श्रावण बाळ योजना यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्य वृद्ध आणि गरजू नागरिकांना मिळण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. या योजनांसाठी अर्ज करताना वय दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला अनिवार्य केल्यामुळे अनेक वृद्धांचे अर्ज रखडले होते. हा गंभीर प्रश्न युवानेते *कृष्णा पाटील आष्टीकर* यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते *अविनाश पाटील हरडफकर* यांनी थेट राज्याचे सामाजिक न्यायमंत्री *संजय शिरसाट* यांच्याकडे मोबाईलवरून मांडला. यावर मंत्री शिरसाट यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, पूर्वीप्रमाणेच शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वय प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यासाठी शासनाच्या जीआर (GR) मध्ये आवश्यक तो बदल करण्याचे महत्त्वपूर्ण आश्वासन दिले आहे.

जाचक अटींमुळे वृद्ध लाभार्थ्यांची होत असलेली कोंडी आणि शासनाच्या विविध मानधन व पेन्शन योजना या समाजातील निराधार, वृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी हक्काचा आधार आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या योजनांचा लाभ घेण्यासाठी वयाचा पुरावा म्हणून जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला बंधनकारक करण्यात आला होता. आजचे अनेक वृद्ध लाभार्थी हे ग्रामीण भागातील असून, त्या काळी जन्माची नोंद असणे किंवा शाळा शिकलेली असणे अत्यंत दुर्मिळ होते. त्यामुळे बहुतांश वृद्धांकडे हे दाखले उपलब्ध नाहीत. या अटीमुळे हजारो पात्र वृद्ध शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहत होते आणि त्यांना अनेक कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत होते.

वृद्धांची ही होणारी फरफट पाहून, युवानेते *कृष्णा पाटील आष्टीकर* यांच्या नेतृत्वात *अविनाश पाटील हरडफकर* यांनी थेट राज्याचे सामाजिक न्यायमंत्री *संजय शिरसाट* यांच्याशी संपर्क साधला. ग्रामीण भागातील वृद्धांना या अटीमुळे कशा प्रकारे अडचणी येत आहेत आणि योजनेचा मूळ हेतू कसा धोक्यात आला आहे, हे त्यांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

मंत्र्यांची सकारात्मक भूमिका अन् आश्वासन सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी या समस्येचे गांभीर्य तात्काळ ओळखून अत्यंत सकारात्मक भूमिका घेतली. वृद्धांना नाहक त्रास होणार नाही याची ग्वाही देत, त्यांनी पूर्वीप्रमाणेच अधिकृत शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेले वय प्रमाणपत्र वयाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाईल, असे सांगितले. यासाठी संबंधित शासन निर्णयात (GR) लवकरच आवश्यक तो बदल करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. मंत्र्यांच्या या सकारात्मक आश्वासनामुळे निराधार आणि वृद्ध लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. शासनाने यावर लवकरच अधिकृत निर्णय घेतल्यास हजारो गरजूंना त्यांचा हक्काचा मोबदला मिळणे सोपे होणार आहे.



## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड रस्त्यावर उतरेल–पवार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

तालुक्यातील शेतकऱ्यांची खरीप हंगामाची पेरणी काही दिवसांवर येऊन ठेपलीली असताना डिझेलसाठी शेतकऱ्यांना रांगेत उभे टाकावे लागत आहे तर कृषी दुकानदाराकडुन जास्त दराने खतांची व बियाणांची विक्री करावी लागत असल्यामुळे स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडच्या वतीने तालुकाध्यक्ष अवधुत पवार यांनी तहसीलदार पल्लवी टेमकर यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांची अडचण दुर करण्याची मागणी केली.

खरिप हंगाम जवळ आला असुन शेतकरी पेरणीसाठी सर्व तयारीला लागलेल्या असताना पेट्रोल पंप धारकांकडुन पेट्रोल मिळत नाही तर दुसरीकडे कृषी दुकानदार खतांची चढ्या दराने विक्री करून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करत आहे खतांवर लिंकिंग वर शासनाने बंदी आणलेली असताना हिमायतनगर तालुक्यात मात्र सर्रास लिंकिंग होत असल्यामुळे स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडच्या वतीने तालुकाध्यक्ष अवधुत पवार यांनी हा सर्व प्रकार



थांबावा यासाठीचे निवेदन तहसीलदार पल्लवी टेमकर यांना दिले शेतकऱ्यांच्या अडचणी दूर नाही झाल्यास स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड रस्त्यावर उतरेल असे त्यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

## मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत २५ मे रोजीची यात्रा स्थगित

लोकनेता न्युज नेटवर्क

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व धर्मियांमधील ६० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना, भारतातील तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांसाठी २५ मे ते ३० मे या कालावधीत महाबोधी मंदीर बुध्दगया (बिहार) येथे यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र काही कारणास्तव लाभार्थ्यांना घेऊन जाणारी २५ मे रोजीची यात्रा स्थगित करण्यात आली असून यात्रेची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त समाजकल्याण विनोद मोहतुरे यांनी केले आहे.

## हिमायतनगरातील शेतकऱ्यांवर खतासाठी अन्याय सुरूच

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

हिमायतनगर येथील काही कृषी सेवा दुकानदारांनी आपल्या दुकानाच्या नावावर असलेला खताचा स्टॉक स्कॅन करून मित्र, नातेवाईक, पाहुणे व इतर व्यक्तींच्या आधार कार्डवर OTP घेऊन स्टॉक उडवण्याचे काम गेल्या चार दिवसांपासून सुरू ठेवले आहे.

आज हिमायतनगरमधील कुठल्याही दुकानात शेतकरी खत मागण्यासाठी गेला तर स्टॉक संपला असे सांगितले जाते. मात्र शहरातील व आसपासच्या गावातील मोठमोठ्या गोडाऊनमध्ये DAP, युरिया, १०:२६:२६,पोटॅश यांसारख्या खतांचा मोठ्या प्रमाणात साठा असल्याची चर्चा आहे.कृषी विभागाने गोडाऊनवर दुकानाचे नाव लिहिण्याचे आदेश दिले असतानाही अनेक गोडाऊनवर कोणतेही बोर्ड लावलेले दिसत नाहीत.खरीप हंगाम तर पूर्ण होईलच, पण रब्बी हंगामासाठीही पुरेल एवढा खतसाठा काही दुकानदारांकडे असल्याचे बोलले जात आहे.



तरीसुद्धा शेतकऱ्यांना खत उपलब्ध नाही असे सांगून दिशाभूल केली जात आहे.

हिमायतनगर व नांदेड जिल्ह्यातील काही कृषी अधिकाऱ्यांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचे काम सुरू असून, जिल्हा कार्यालय व कृषी विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकरी बांधवांकडून होत आहे.

## पूर्णा खून प्रकरणाचा अवघ्या चार तासांत आरोपी ताब्यात

# स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई दोन आरोपी नांदेडमधून जेरबंद

लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी । रमेश मुलगीर**

पूर्णा शहरात शुक्रवारी सकाळी घडलेल्या खळबळजनक खून प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना अवघ्या चार तासांत यश आले असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन आरोपींना नांदेड येथून ताब्यात घेतले आहे.



शहरातील गुड मॉर्निंग रोड परिसरात खासगी सावकार देवराव बेजाजी साखरे यांच्या निर्घृण हत्येमुळे सकाळ पासूनच शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत तातडीने आरोपी निष्पन्न करून अटक करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. समाधान पाटील, पोलीस निरीक्षक सचिन बेंद्रे, स. पो. नि. गजानन पाटील यांनी तपासाची सूत्रे वेगाने हलविली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक सक्रिय करण्यात आले.

सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांच्या नेतृत्वाखाली सपोनि जायभाय, उपनिरीक्षक केंद्रे, चट्टे, पोलीस अंमलदार महेश कवठाळे, राहुल परसोडे, सचिन भदरगे, माणिक वाघ, फारुकी, दिलीप निलपत्रेवार, शरद सावंत, हनुमान ढगे,दीपक मतिराज रफिक तसेच चालक सूर्यकांत सातपुते व चालक साने यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी करून आरोपींची ओळख पटवली. तांत्रिक तपास आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपी नांदेड येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने नांदेड येथे सापळा रचला.

आरोपी गणेश चंद्रकांत घोरपडे व रमेश गंगाधर घोरपडे यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान जुन्या भांडणाच्या कारणावरून खून केल्याची कबुली आरोपींनी दिल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

दोन्ही आरोपींना पुढील चौकशी आणि कायदेशीर कारवाईसाठी पूर्णा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून, प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत. पूर्णा पोलिसांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे कारण की चार तासातच आरोपी ताब्यात घेतले आहेत

## पाचोड दुनगांव परिसरात डिझेलचा तुटवडा शेती मशागतीची कामे रखडली,शेतकरी चिंतेत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

पाचोड परिसरात सध्या खरीप हंगामपूर्व शेतीच्या कामांना वेग आला असून शेतकरी नांगरणी, वखरणी, रोटाव्हेटर तसेच इतर मशागतीची कामे करण्यात व्यस्त आहेत. दरम्यान, ऐन शेतीकामांच्या तोंडावर डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे. परिसरातील अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा पुरवठा अपुरा होत असल्याने वाहनधारकांसह शेतकऱ्यांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे.




शेती मशागतीसाठी ट्रॅक्टर, पंप, जनरेटर तसेच इतर यंत्रसामग्री मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. या सर्व यंत्रणा डिझेलवर चालत असल्याने सध्या डिझेलची मागणी वाढली आहे. मात्र पुरवठा कमी पडत असल्यामुळे अनेक ठिकाणी डिझेल मिळवण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. काही पेट्रोल पंपांवर सकाळपासूनच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून येत आहे.

डिझेल वेळेवर मिळत नसल्याने शेतीची कामे खोळंबत असून अनेक शेतकऱ्यांना आपली मशागतीची कामे पुढे ढकलावी लागत आहेत. सध्या पावसापूर्व तयारीचा महत्त्वाचा काळ असल्याने वेळेत शेती मशागत पूर्ण करणे आवश्यक आहे. मात्र इंधनाच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांचे नियोजन विस्कळीत होत असल्याचे दिसत आहे.

याशिवाय, ट्रॅक्टर चालक व वाहतूकदारांनाही या परिस्थितीचा फटका बसत आहे. डिझेलसाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत असल्याने वेळ आणि आर्थिक नुकसान होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी डिझेल संपल्याचे फलक लावण्यात आल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, प्रशासन आणि संबंधित तेल कंपन्यांनी पाचोड परिसरात डिझेलचा सुरळीत पुरवठा करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. शेतीच्या हंगामात इंधनटंचाई निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम शेती उत्पादनावर होऊ शकतो, अशी चिंता देखील व्यक्त केली जात आह

# अंबड येथे १०० लिटर डिझेल जप्त; तहसीलदार विजय चव्हाण यांचा इशारा–कारवाई सुरूच राहणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जालना । डॉ.ज्ञानेश्वर जगताप**

अंबड तालुक्यात अवैधरीत्या पेट्रोल–डिझेलची साठवणूक करून चढ्या दराने विक्री करणाऱ्यांविरोधात प्रशासनाने शुक्रवारी (दि. २३ मे) मोठी धडक कारवाई केली. महसूल व पुरवठा विभागाच्या संयुक्त पथकाने विविध ठिकाणी छापे टाकून तब्बल १०० लिटर अवैध डिझेल जप्त केले. या कारवाईमुळे अवैध इंधन विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

तहसीलदार विजय चव्हाण आणि तालुका पुरवठा अधिकारी किरणकुमार खांडेभराड यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. तालुक्यात काही ठिकाणी विनापरवाना डिझेलचा साठा करून त्याची बेकायदेशीर विक्री होत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाल्यानंतर तातडीने कारवाईचे आदेश देण्यात आले.

या ठिकाणी झाली कारवाई

प्रशासनाच्या पथकाने अचानक छापेमारी करत खालील ठिकाणांहून अवैध डिझेल जप्त केले –

कानडगाव येथील स्वामी समर्थ किराणा दुकान येथून १० लिटर डिझेल जप्त चिंचखेड येथील अर्जुन झेरॉक्स अँड मल्टि सर्विसेस मधून ४० लिटर डिझेल हस्तगत


शहापूर येथील स्वामी समर्थ नाश्ता सेंटर वर सर्वाधिक ५० लिटर डिझेल आढळून आले

या सर्व प्रकरणांमध्ये संबंधितांवर नियमानुसार पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

अवैध इंधन विक्रेत्यांची गय नाही

अवैधरीत्या पेट्रोल–डिझेलचा साठा करणे हे अत्यंत धोकादायक असून त्यामुळे मोठ्या दुर्घटना घडू शकतात, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

तालुक्यातील नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी विनापरवाना इंधन साठवणूक टाळावी, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही महसूल व पुरवठा विभागाने दिला आहे.



**अंबड तालुक्यात अवैध रित्या इंधन साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. आजची कारवाई ही फक्त सुरुवात असून अशी धडक मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहील,**

**– विजय चव्हाण, तहसीलदार अंबड**

# डी.ए.पी.खताला उत्तम पर्याय उपलब्ध;देगलूर कृषी विभागाचे शेतकऱ्यांना महत्त्वाचे आव्हान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

सध्या बाजारपेठेत डी.ए.पी.(DAP,) खताचे टंचाई जाणवत असल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आणि उत्पादकता टिकवुन ठेवण्यासाठी
केवळ डी.ए.पी. खतावर अवलंबून न राहता इतर पर्यायी खतांचा वापर करावा असे आव्हान देगलूर तालुका कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.
डी.ए.पी. मधील अन्नद्रव्याची कमतरता भरून काढण्यासाठी बाजारपेठेत अनेक सक्षम आणि फायदेशीर पर्याय उपलब्ध आहेत
१. 'एस. एस. पी.
(सिंगल सुपर फॉस्फेट) हा सर्वोत्तम
सुफरयुक्त खतामध्ये डीएपी नंतर सर्वाधिक मागणी एस. एस. पी.
(Singal super phosphate )
या खताला आहे. विशेषता: गळीत धान्य तेलबिया पिकांसाठी एस. एस. पी. खतांचा वापर अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. कारण यामध्ये सल्फर गंधक हे महत्त्वाचे अन्नद्रव्य असते. जे तेलबिया पिकांच्या वाढीसाठी आणि तेलाचे प्रमाण वाढवण्यासाठी आवश्यक आहे.
खत वापराचे अचूक प्रमाण
१ गोणी डी.ए.पी. -अर्धी गोणी युरिया+३ गोण्या एस.एस.पी.(जर तुम्ही एक गोणी डी.ए.पी. वापरणार असाल, तर त्याऐवजी अर्धी गोणी युरिया आणि तीन गोण्या सिंगल सुपर फॉस्फेट एकत्र करून दिल्यास डी.ए.पी. एवढेच पोषण पिकाला मिळते.)
२ 'टी. एस. पी. (ट्रिपल सुपर फॉस्फेट) चा वापर डी.ए.पी.ला दुसरा एक उत्तम पर्याय म्हणजे टी. एस. पी. '(ट्रिपल सुपर फॉस्फेट)
चा वापर डी.ए.पी.ला दुसरा एक उत्तम पर्याय म्हणजे टी. एस. पी.
(Triple super phosphate )
या खतामध्ये तब्बल ४६% स्फुरद हे अन्नद्रव्य असते. खत वापराचे अचूक प्रमाण
१ गोणी डी.ए.पी.-अगदी गोणी युरिया+ १ गोनी टी.एस. पी. ३ विविध 'एन. पी.के.' (NPK)
संयुक्त खताचे पर्याय शेतकरी डी.ए.पी. ऐवजी बाजारात उपलब्ध असणाऱ्या खालील विविध ग्रेडसच्या संयुक्त खतांचा वापर सहज करू शकतात.NPK १०,:२६,:२६,छझघ २०:२०:०१३, NPk १२:३२:१६,NPK १५;१५:१५ ,NPK१४:३५:१४,छझघ १६: १६:०:२०, NPK २०: २०;०+पोटॅश NPK १८:१८:१०
कृषी विभागाचा सल्ला*डी.ए.पी.च्या उपलब्धतेची वाट न पाहता वरील पर्याय खतांचा संतुलित वापर करावा. जेणेकरून वेळेवर पेरणी व खत व्यवस्थापन करणे शक्य होईल. यामुळे पिकाला सर्व आवश्यक्य अन्नद्रव्ये मिळून खर्चातील बचत होईल, असे कसे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. हे आव्हान खालील अधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.
**एम.जी. सोनकांबळे :** कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) , तालुका कृषी अधिकारी कार्यालय देगलूर,
एस.टी. कावटवाड ,: प्रभारी तालुका कृषी अधिकारी, देगलूर
संजय लहाने : कृषी अधिकारी (नियंत्रण, पंचायत समिती



## मंठा पोलिसांची अवैध धंद्यांविरोधात धडक कारवाई
## जुगार, दारु व वाळूचोरी प्रकरणी गुन्हे दाखल



लोकनेता न्यूज नेटवर्क

**जालना । डॉ ज्ञानेश्वर जगताप**

दि. २३ मे रोजी मंठा पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी धडक कारवाई करत विविध प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल केले आहेत. अवैध जुगार, दारू विक्री तसेच वाळूचोरी करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलण्यात आली असून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीसांनी केलेल्या कारवाईत अवैध जुगाराच्या २ केसेसमध्ये तब्बल १ लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच अवैध दारू विक्रीच्या २ प्रकरणांमध्ये १ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.याशिवाय वाळूचोरीच्या १ प्रकरणात सुमारे ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करत संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंठा परिसरात अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याची माहिती पोलिस प्रशासना कडून देण्यात आली. या धडक कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

## निधीअभावी हजारो घरकुले रखडली! कच्चे घर मोडले, पावसाळ्यापूर्वी लाभार्थ्यांची कसोटी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

पक्क्या घराचे स्वप्न उराशी बाळगून आदिवासी बहुल किनवट तालुक्यातील हजारो लाभार्थ्यांनी आपली कच्ची घरे मोडून टाकली. मात्र, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा क्रमांक ०२ अंतर्गत जम्बो उद्दिष्ट असूनही, योजनेला बजेट नसल्याने हजारो लाभार्थ्यांची घरे आज अर्धवट अवस्थेत आहेत. आता पावसाळा तोंडावर आल्याने हप्ते रखडलेल्या लाभार्थ्यांवर टीनपत्रे किंवा मांडव घालून राहण्याची वेळ आली असून, त्यांची मोठी फजिती होण्याची चिन्हे दिसत आहेत. या तालुक्यात २०२४-२५ आणि २०२५-२६ या वर्षांसाठी मोठे उद्दिष्ट देण्यात आले होते; परंतु प्रत्यक्षात कामाची गती अत्यंत संथ आहे. तालुक्याचे एकूण उद्दिष्ट १९,२१३ असून नोंदणी झालेली घरे १८,९८८, जिओ टॅग पूर्ण १८,९६५ असून




यातील केवळ ३६९ घरकुलच पूर्ण झाले आहे. पहिला हप्ता १५,५५१ लाभार्थीच्या खात्यावर जमा करण्यात आला. दुसरा हप्ता ६,०३४ लाभार्थीच्या खात्यात जमा झाला. तिसरा हप्ता २,४६४ लाभार्थीच्या खात्यात जमा झाला.
चौथा व पाचवा हप्ता नगण्य म्हणजे अत्यंत कमी आहे. निधी वेळेवर न मिळाल्यामुळे हजारो लाभार्थ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. सध्या तालुक्यात बांधकामाची स्थिती अत्यंत बिकट असून काम सुरू न झालेले १२,१४२ घरकुल असून बेसमेंट (पाया) लेव्हलला असलेले काम ६,५३०, लिंटेल लेव्हलपर्यंत आलेले काम १६० छताचे (स्लॅब) काम पूर्ण झालेले घरकुल केवळ १२ आहेत. काहींनी इकडून-तिकडून उसनवारी करून किंवा कर्ज काढून स्लॅब टाकला आहे, तर बहुतांश लाभार्थी केवळ पाया उभारून पुढील हप्त्याची वाट पाहत आहेत.

### १ लाख २० हजारांच्या अनुदानात घर कसे बांधावे

**एकीकडे घरकुलासाठी लागणारे सिमेंट, विटा आणि गजांचे भाव गगनाला भिडले आहेत. दुसरीकडे शासनाने जाहीर केलेली ५ ब्रास मोफत वाळू योजना केवळ कागदावरच राहिली आहे. प्रत्यक्षात लाभार्थ्यांना वाळू मिळत नसल्याने, त्यांना महागड्या दराने वाळू विकत घ्यावी लागत आहे. अशा परिस्थितीत अवघ्या १ लाख २० हजार रुपयांच्या अनुदानात पक्के घर उभे करावे कसे, हा यक्षप्रश्न लाभार्थ्यांसमोर आहे. पावसाळ्याला आता काहीच दिवस शिल्लक राहिले आहेत. ज्यांनी पक्क्या घराच्या आशेने आपली जुनी घरे पाडली, ते सध्या तात्पुरत्या मांडवात किंवा टीनपत्र्यांच्या शेडमध्ये राहत आहेत.**

## यासीन दगडू खा पठाण यांचे दु:खद निधन

लोकनेता न्यूज नेटवक

**दुनगाव । त्रिसिंग जायभाये**



दुनगाव येथील ज्येष्ठ नागरिक यासीन दगडू खा पठाण यांचे दि. २२ रोजी दुपारी १ वाजता दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.ते अजीज पठाण (माजी उपसरपंच, दुनगाव) यांचे वडील होते. त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी,सुना, नातवंडे पनतु असा मोठा परिवार आहे.दि. २२ रोजी दुपारी त्यांच्या पार्थिवावर दुनगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल गावातील नागरिकांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

## घारोळा येथील ग्रामदैवत केतकी संगमेश्वर देवस्थान च्या वतीने सत्कार संपन्न
## चाकूर तालुक्यातील घारोळा गावचे सुपुत्र सेवानिवृत्त अभियंता शिवलिंग उळागड्डे यांच्या वतीने संजय गांधी निराधार समिती तथा मान्यवराचा सत्कार संपन्न

लोकनेता न्यूज नेटवक

**जीवन जाधव । औसा**

घारोळा येथे सेवानिवृत्त अभियंता शिवलींग ऊळागड्डे यांच्या तर्फे आज घारोळा येथील केतकी संगम मंदिरामध्ये संजय गांधी निराधार कमीटी सह मान्यवरांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे सदस्य भानुदास दादा पोटे साहेब . संजय गांधी निराधार समिती चाकूर अध्यक्ष सिद्धेश्वर आप्पा अंकलकोटे. चाकूर पंचायत समितीचे उपसभापती भुजंगरावजी शिंदे. चाकूर पंचायत समितीचे सदस्य गजानन होनराव. नगरसेवक प्रतिनिधी रामभाऊ कसबे. संजय गांधी निराधार समितीचे सदस्य खुदबुद्दीन घोरवाडे. सदस्य पांडुरंगजी धडे. लातूर रोड चे माजी सरपंच मधुकर मुंडे. मा. उपसरपंच अब्दुल भाई शेख. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते नागोराव पाटील. घारोळा गावचे पोलीस पाटील गंगाधर बनसोडे . सुहास मोठेराव. व्यंकटराव माळी . उमाकांत बुक्के मनोज भाऊ उळागड्डे. इस्माईल भाई शेख. तानाजी वाघमारे.कल्याण शिंदे.महादेव बनसोडे. तातेराव शिंदे. अनील शिंदे.तात्यासाहेब जाधव सह घारोळा गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते



# भोकरदन शहरात सेक्स रॅकेटचा पर्दाफाश; वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या पती-पत्नीसह घरमालकावर गुन्हा दाखल!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । डॉ ज्ञानेश्वर जगताप**

शहरात बाहेरील जिल्ह्यातील महिलांना बोलावून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या एका पती-पत्नीवर भोकरदन पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या छाप्यात पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून रोख रक्कमेसह मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.गुप्त माहितीवरून पोलिसांचा छापा मिळालेल्या माहितीनुसार, २३ मे २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजेच्या सुमारास भोकरदन पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. किरण बिडवे यांना एक खात्रीशीर बातमी मिळाली होती. भोकरदन शहरातील म्हाडा कॉलनी येथील गजानन मंदिराजवळ असलेल्या एका टिनपत्राच्या शेडमध्ये एक दांपत्य बाहेरील जिल्ह्यातील महिलांना आणून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत आहे.
या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये पोलीस पथकाने दुपारी १४:४५ वाजता म्हाडा कॉलनीतील ज्ञानेश्वर विनायक वाघ यांच्या मालकीच्या जागेत अचानक छापा टाकला.आरोपींची नावे आणि जप्त मुद्देमालया छाप्यात खालील आरोपींना निष्पन्न करून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे:
१) गणपत रामधीन सेठी(वय ५४ वर्षे, रा. राजुर, ता. भोकरदन, जि. जालना)
२) गितांजली गणपत सेठी (वय ५१ वर्षे, रा. राजुर, ता. भोकरदन, जि. जालना)
३) ज्ञानेश्वर विनायक वाघ(खोली मालक, रा. भोकरदन, जि. जालना)
पोलिसांनी घटनास्थळावरून पीडित महिलांची सुटका केली असून *३५,६८० रुपयांचा रोख मुद्देमाल* जप्त केला आहे.
अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल**
आर्थिक फायद्यासाठी वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या या पती-पत्नीसह, त्यांना जागा उपलब्ध करून देणाऱ्या खोली मालकाविरुद्ध *अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ (PITA) च्या कलम ३, ४ आणि ५* प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या पती-पत्नीवर यापूर्वीही पोलीस ठाणे हसनाबाद येथे अशाच प्रकारचा गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.
*या पोलीस पथकाने केली कारवाई*
ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेघबिर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. डॉ. नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.
या कारवाईत पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत, चालक ग्रेड पोउपनि चव्हाण, पोलीस अंमलदार प्रशांत उबाळे, शिवाजी जाधव, किशोर मोरे, संदीप भुतेकर, महिला पोलीस अंमलदार सिमा देटे आणि जयश्री कुहीरे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. भाऊसाहेब सहाने आणि पो.अ. इंदल बमनावत करत आहेत.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933